# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः27.09.2025** **वारःशनिवार**

---

1. पंतप्रधान मोदी यांच्या ओडिशा दौऱ्यात आज विविध प्रकल्पांची पायाभरणी
2. महाराष्ट्रातल्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी केंद्राकडे निवेदन सादर
3. देशभरात उभारलेल्या बीएसएनएलच्या स्वदेशी फोर जी यंत्रणेचं आज उद्घाटन आणि
4. आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारताकडून श्रीलंकेचा पराभव

**<u>पंतप्रधान-ओडिशा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दिवसभराच्या ओडिशा दौऱ्यावर असून या भेटीत ते झारसुगुडा इथून साठ हजार कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करतील. दूरसंचार, रेल्वे, उच्च शिक्षण, आरोग्यसेवा, कौशल्य विकास, ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्र अशा विविध क्षेत्रांतील हे प्रकल्प आहेत. या प्रसंगी मोदी सार्वजनिक सभेलाही संबोधन करतील. दूरसंचार क्षेत्रात, स्वदेशी तंत्रज्ञानाच्या आणि सुमारे 37 हजार कोटी रुपये खर्चाच्या 97 हजार 500 पेक्षा जास्त मोबाईल 4G टॉवर्सचं उद्घाटन पंतप्रधान करतील, तसंच महत्त्वाच्या रेल्वे प्रकल्पांचं भूमिपूजन करून ते राष्ट्राला समर्पित करतील. या प्रकल्पांमुळे ओडिशा आणि शेजारी राज्यांमध्ये मालवाहतूक आणि प्रवासी वाहतुकीत मोठ्या प्रमाणावर सुधारणा होऊन स्थानिक उद्योग आणि व्यापाराला बळकटी मिळेल.

**<u>पंतप्रधान-मुख्यमंत्री</u>**

महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी केंद्र सरकार खंबीरपणे उभं आहे, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नवी दिल्लीत पंतप्रधानांची भेट घेतली. राज्यातली अतिवृष्टी, पूरस्थिती आणि त्यामुळं शेतकऱ्यांचं झालेलं नुकसान याबाबत त्यांनी पंतप्रधानांना माहिती दिली, तसंच केंद्र सरकारकडून भरीव मदतीसाठी निवेदनही त्यांना सादर केलं, त्यावेळी पंतप्रधानांनी हे आश्वासन दिल्याचं फडणवीस यांनी माध्यमांना सागितलं. राज्यातील संरक्षण कॉरिडॉर, गडचिरोलीतील पोलाद उत्पादनासाठी सवलती, दहिसर इथल्या भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या जागेचं हस्तांतरण अशा विविध विषयांवरही यावेळी सविस्तर चर्चा झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या 8 आणि 9 ऑक्टोबर रोजी फिनटेक परिषदेसाठी मुंबईत येणार असून, नवी मुंबई विमानतळ आणि मेट्रो-3 या प्रकल्पांचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. दरम्यान नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचंच नाव देण्यात येईल, तसा प्रस्ताव आम्ही पाठविला आहे, अशी माहितीही मुख्यमंत्र्यांनी माध्यमांशी बोलताना दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नवी दिल्लीत नवनिर्वाचित उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांचीही सदिच्छा भेट घेतली.

**<u>बीएसएनएल</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी ओडिशातील झारसूगुडा इथून बीएसएनएलच्या स्वदेशी फोर जी नेटवर्क यंत्रणेचं लोकार्पण आज करणार आहेत. देशभरात सुमारे 98 हजार ठिकाणी बीएसएनएल फोर जी यंत्रणा बसवण्यात येणार आहे. ही यंत्रणा नंतर

फाईव-जीमध्येही रुपांतरित केली जाईल असं दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी काल माध्यमांना सांगितलं. आत्मनिर्भर भारत संकल्पनेला बळकटी देणाऱ्या, या उपक्रमाचा राज्यातील प्रारंभ, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पुण्यातून होणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदेही या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

**पंतप्रधान-बिहार**

पंतप्रधान मोदी यांनी मुख्यमंत्री महिला रोजगार योजने अंतर्गत बिहारमधल्या 75 लाख महिलांच्या बँक खात्यात प्रत्येकी 10 हजार रुपये जमा केले. स्वयंरोजगार आणि उपजीविकेच्या संधीद्वारे महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन देणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेच्या लाभार्थी महिलांशी मोदी यांनी दूरस्थ पद्धतीने संवाद साधला.

**चौहान**

केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल प्रधानमंत्री किसान सन्मान निधीयोजनेचा 21 वा हप्ता दूरस्थ पद्धतीने लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केला. 2 लाख 70 हजार महिला शेतकऱ्यांसह 27 लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात 540 कोटी हून अधिक रुपये हस्तांतरित करण्यात आले असल्याची माहिती चौहान यांनी दिली. पूर आणि भूस्खलनाचा मोठा फटका बसलेल्या हिमाचल प्रदेश, पंजाब आणि उत्तराखंड मधल्या शेतकऱ्यांना प्राधान्याने हा हप्ता देण्यात आला. दरम्यान, केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल दिल्लीत रशियाचे उपपंतप्रधान दीमित्रि पात्रूशेव यांची भेट घेत कृषि आणि अन्नसुरक्षा क्षेत्रात परस्पर सहकार्यावर चर्चा केली.

**सेवापर्व-वारसा जतन**

भारताच्या सांस्कृतिक वारशाचं जतन आणि संवर्धन व्हावं यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, केंद्र सरकार विविध पातळ्यांवर काम करत आहे. आजच्या सेवा पर्वच्या भागात ऐकुया भारताच्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनाबाबतचा वृत्तांत .....

**भारताचा सांस्कृतिक वारसा अधोरेखित करणाऱ्या अनेक कलाकृतींची परदेशात तस्करी करण्यात आली होती, अशा अनेक मौल्यवान कलाकृती आता राजनैतिक मार्गांनी, कायदेशीर कारवाईद्वारे आणि सांस्कृतिक सहकार्याद्वारे परत मिळवल्या जात आहेत. 2014 पासून अशा 642 पुरातन वस्तू, शिल्प पुन्हा भारतात आणण्याची प्रक्रिया सुरू आहे. ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकातील भगवान बुद्धांचे पिप्रहवा अवशेष, यूकेमधील ब्रह्मा आणि ब्राह्मणीचे शिल्प, अमेरिकेतील दुर्गेची प्रतिमा, अमेरिकेतील नटराजाचे वालुकाशिल्प अशा काही वस्तू भारतात आणल्या आहेत; तर काही पंतप्रधान मोदींना त्यांच्या परदेश दौऱ्यांदरम्यान परत करण्यात आल्या आहेत. याबाबत बोलताना पंतप्रधान म्हणतात....**

**देशाचा वारसा हा केवळ इतिहास नसूनतो मानवतेची अनुभूति आहे, असं पंतप्रधानांनी एका भाषणात म्हटलं होतं... हाच वारसा जतन करण्यासाठी केंद्र सरकार अविरत काम करत आहे...**

**GST**

केंद्र सरकारनं 22 तारखेपासून सुरू केलेल्या जी एस टी बचत उत्सवाचा समाजातल्या सर्व घटकांना फायदा होत आहे. नवीन GST सुधारणांच्या अंतर्गत पर्यटन आणि सार्वजनिक वाहतूक अधिक परवडणारी बनवण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण कर कपात जाहीर केली आहे. भारताची अप्रत्यक्ष कर प्रणाली सोपी करण्याच्या दिशेनं हे महत्वाचं पाऊल आहे. विविध वस्तु

आणि सेवांवरील कराचे दर कमी केल्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाल्याच आकाशवाणीच्या प्रतिनिधींनी सांगितलं आहे.

**गोयल**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी काल नवी दिल्लीत रशियाचे उपपंतप्रधान दिमीत्री पात्रुशेव यांच्या नेतृत्वाखालील प्रतिनिधी मंडळाबरोबर चर्चा केली. भारत-रशिया भागीदारीला अधिक दृढ करण्यासाठी आणि व्यापार, सेवा आणि औद्योगिक सहकार्यामध्ये नव्या संधी शोधण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचं समाज माध्यमावरील एका पोस्टमध्ये गोयल यांनी म्हंटलं आहे. दोन्ही देशांच्या प्रगतीसाठी अधिकाधिक संधींचा शोध घेऊन धोरणात्मक संबंधांना अधिक मजबूत करण्याचा दोन्ही देशांचा उद्देश असल्याचंही ते म्हणाले.

**एनआयए**

एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास यंत्रणेनं काश्मीर खोऱ्यात हिज्बुल मुजाहिद्दीनचा दहशतवादी तारिक अहमद मीरची स्थावर मालमत्ता जप्त केली आहे. काश्मीर खोऱ्यातील दहशतवादी कारवायांना बळ देणासाठी शस्त्रं आणि दारूगोळा पुरवल्याचा त्याच्यावर आरोप आहे. जम्मूतील एनआयएच्या विशेष न्यायालयाच्या आदेशानुसार एनआयएनं एप्रिल मध्ये तारिकला अटक केली होती. देशातील शांतता, स्थैर्य आणि सौहार्द बिघडवण्याच्या उद्देशानं काश्मीरमध्ये कार्यरत असलेल्या दहशतवादी जाळ्याविरोधात एनआयएनं सुरू केलेल्या कारवाईचा हा भाग आहे, असं एनआयएनं म्हटलं आहे.

**ओडिशा**

बंगालच्या उपसागरात निर्माण होणाऱ्या कमी दाबाच्या पट्टयामुळे ओडिशामध्ये मुसळधार पावसाची शक्यता असून मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांनी आज 17 जिल्हाधिकाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. झारसुगुडा इथं दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून घेतलेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीत माझी यांनी या सूचना दिल्या.

**अंमली पदार्थ**

नवी मुंबई पोलिस आयुक्तालयाने सुरू असलेल्या अंमली पदार्थ मुक्त नवी मुंबई मोहिमे अंतर्गत 26 कोटी 48 लाख रुपयांचे अंमली पदार्थ काल नष्ट केले. 35 वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये हे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले होते. अमली पदार्थ तस्करीसंदर्भात अटक करण्यात आलेल्यांमध्ये 101 परदेशी नागरिकांचा समावेश असल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं. नवी मुंबईत बेकायदेशीर पणे राहणाऱ्या 2 हजार 34 जणांना हद्दपार करण्यात आलं.

**क्रिकेट**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या सुपर फोर फेरीतील शेवटच्या सामन्यात काल भारतानं श्रीलंकेचा सुपर ओवर मध्ये पराभव केला. निर्धारित 20 षटकांत दोन्ही संघांच्या प्रत्येकी 202 धावा झाल्यानं सामना सुपर ओवर मध्ये खेळवला गेला. सुपर ओवर मध्ये श्रीलंकेनं प्रथम फलंदाजी करताना केवळ 2 धावा केल्यानंतर भारतानं पहिल्याच चेंडूवर 3 धावा करून विजय साकारला. अंतिम लढत उद्या भारत आणि पाकिस्तान दरम्यान होणार आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**